महाराष्ट्र शासन

# शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार, छत्रपती संभाजीनगर

रेल्वे स्टेशन समोर पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**Government Stationery & Book Depot, Chhatrapati Sambhajinagar.**

*Paithan Road, Near Railway Station, Chhatrapati Sambhajinagar - 431 005*

e-mail gss.aurangabad@maharashtra.gov.in Tel. Ph. Office 0240-2951468, Book Depot Ph. 2331525

क्रमांकः आस्था/ना.स./1095 दिनांक:- 26 MAR 2025

प्रति,

मा.संचालक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री,
मुंबई-०४.

विषय :- नागरीकांची सनद अद्यावत करुन प्रसिध्द करण्याबाबत.
संदर्भ :- मा.संचालनालयाचा दिनांक २५/०३/२०२५ चा ई-मेल संदेश.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय ई-मेल संदेशान्वये कळविण्यात येते की, या कार्यालयाची नागरीकांची सनद ई-मेलवर सॉफ्ट कॉपीसह या सोबत जोडण्यात येत आहे. कृपया अवलोकनीय घ्यावे, ही विनंती.

आपला,

प्र.सहायक संचालक, (क.)
शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार,
छत्रपती संभाजीनगर.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# नागरिकांची सनद

**सन २०२१-२२**

# शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार

## रेल्वेस्टेशन जवळ, पैठण रोड,
## छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५.

दुरध्वनी क्रमांक : ९१२४०-२९५१४६८/२३३१५२५,

ई-मेल : gss.aurangabad@maharashtra.gov.in

मुख्य कार्यालय : संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.

विभाग- : उद्योग,उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**४. शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागाराचे कार्य:-** शासनाने या कार्यालयाकडे मराठावाडा विभागातील तसेच अहमदनगर व जळगांव जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालयांना लेखनसामग्री, रेखाचित्र सामग्री, गणवेशाचे कापड, छत्र्या, टंकलेखन यंत्रे, प्रतिलिपी यंत्रे आणि शासकीय प्रकाशने पुरवठा करण्यांचे काम सोपविले आहे. व मराठावाडा विभागातील जनतेची नांवे, धर्म व जन्मतारिख बदलण्याबाबतची कामे देखिल सोपविलेली आहेत. तसेच मराठवाडा विभागातील जिल्हा परिषदा, धर्मदाय आयुक्त तसेच सेवा योजन कार्यालय यांना देखिल वरिल प्रमाणे सामग्रीचा आकारणी तत्वावर या कार्यालयामार्फत पुरवठा केला जातो. लोकसभा, विधानसभा, जिल्हापरिषदा, पंचायत समित्या, महानगर पालिका इत्यांदीच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकसाठी आवश्यक लागणारी सामग्री शासनाने विहित केलेल्या परिमाणानुसार व शासनाच्या काटकसरीच्या धोरणानुसार पुरवठा करण्यांत येते.

तसेच शासकीय ग्रंथागारामार्फत न्यायालयीन उपयोगाची अधिनियम, निमय, सांस्कृतिक, मराठी विश्वकोश, सामाजिक, शेक्षणिक अशा प्रकारची महाराष्ट्र शासनाचे प्रकाशने तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र मध्यवर्ती उपविभाग व छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी, महाराष्ट्र राज्याचे नकाशे इत्यांदीची विक्री अल्पदरात केली जाते.

**५. कार्यपूतीचे वेळापत्रक:-** या कार्यालयातील कामकाजाचा सामान्य जनतेशी प्रत्यक्ष संबंध येत नसला तरी सामान्य जनतेच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी शासनाच्या विविध विभागांकडुन, कार्यालयाकडून मागणी केली जाणारी लेखनसामग्री संबंधीत विभागास/कार्यालयास शासनाने ठरवुन दिलेल्या विहित परिमाणानुसार करण्यांत येतो. तसेच या कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या शासकीय ग्रंथागारामार्फत विविध विषयाच्या प्रकाशनाची अल्प दरात विक्री केली जात असल्याने, सांस्कृतिक, सामाजिक, मराठी विश्वकोश, शैक्षणिक इत्यांदी विषयाचे ज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोचविण्यांचे काम हे कार्यालय करत असल्यामुळे अप्रत्यक्षरित्या हे कार्यालय सामान्य जनतेसाठी अविरतपणे कार्यरत असुन हे कार्यालय शासन व सामान्य जनता या मधिल अत्यंत महत्वाचा दुवा आहे. या संदर्भात कामाचा क्रम शासनाने ठरवुन दिलेल्या वेळेनुसार शासकीय विभागाना/कार्यालयांना आवश्यक लागणारी लेखनसामग्री व इतर साहित्य विहित परिमाणानुसार पुरवठा करण्यांत येतो. वरिल सर्व कामकाजावर या कार्यालयाचे कार्यालय प्रमुख म्हणुन सहायक संचालक यांचे नियंत्रण असुन प्रत्येक विभागातील कामकाजावर त्यात्या विभागाचे विभाग प्रमुख नियंत्रण ठेवतात.

**५. (अ) गा-हाणी/तक्रारी यांचे निराकरणः-** कार्यपूर्तीस होणारा विलंब अथवा अन्य काही गा-हाणी/तक्रारी असल्यास, परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या अधिका-यांकडे तक्रार नोंदविता येईल, तक्रार प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांत त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधीत अधिका-यांची राहील. यानंतरही जनतेचे समाधान न झाल्यांस मा.संचालक, शासन मुद्रण, लेखन सामग्री व प्रकाशन संचालनालय, चर्नी रोड. मुंबई-४ यांच्याकडे त्यांना तक्रार करता येईल. जनतेने त्यांची गा-हाणी समक्ष भेटीत/पत्राने किंवा gss.aurangabad@maharashtra.gov.in या ई-मेलवरही मांडता येतील.

**(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकनः-** या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा या कार्यालयाकडुन दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

**(क) जनसामान्यांकडून सूचनाः-** ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी खुली आहे. नागरिकांच्या सूचनांचा विचार करुन, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून अणता येतील. या कार्यालयाच्या अधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या शासकीय कार्यालयांना तसेच नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

**६ नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणीः-** शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार, औरंगाबाद हे नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरवितांना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी या कार्याल्यातील प्रत्येक अधिकारी/कर्मचा-यांची राहील.

## परिशिष्ट-१

## शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार छत्रपती संभाजीनगर.

## संचालक/सहाय्यक संचालक/प्रमुख लिपीक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | संचालक, शासन मुद्रण व लेखन सामग्री, चर्नी रोड, मुंबई-४ | विभाग प्रमुख तथा या कार्यालयाचे नियंत्रण अधिकारी | १.मुद्रण विभागातील सर्व शासकीय मुद्रणालये, शासकीय लेखनसामग्री आगारे, शासकीय टंकलेखन यंत्रे कर्मशाळा व शासकीय ग्रंथागारे यांच्या दैनंदिन कामकाजावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे. |
| २. | सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार , छत्रपती संभाजीनगर | अहरण व संवितरण अधिकारी | १. या कार्याल्यातील कर्मचा-यांच्या सेवाविषयक व प्रशासनिक बाबींवर नियंत्रण तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामकाज पहाणे. .<br>२. लोकसभा विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समित्या नगरपालिका, महानगर पालीका इत्यादींचे निवडणूककरिता लागणारी लेखनसामग्री व तद्‌नुषंगिक कामकाजावर नियंत्रण ठेवुन सदर कामे पूर्ण करुन देणे.<br>३. मराठवाडा विभागातील व अहमदनगर व जळगांव जिल्हयांतील शासकीय कार्यालयांना लेखनसामग्री व इतर साहित्यचा पुरवठा करणे तसेच संचालनालयाकडुन प्राप्त होणारी लेखनसामग्री व इतर वस्तू तसेच तद्‌नुषंगिक कामे पूर्ण करुन देणे. |
| ३. | प्रमुख लिपीक | - | १. कार्यालय व चतुर्थश्रेणी विभागातील कर्मचा-यांच्या दैनंदिन कामकाज पहाणे. |

# परिशिष्ट-२

## शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार, छत्रपती संभाजीनगर

| अ.क्रं | सेवांचा तपशिल | सेवा परविणारे अधिकारी/कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास, तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | मराठवाडा विभागातील तसेच अहमदनगर व जळगांव जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालयांना लागणारी लेखनसामग्री व इतर साहित्य पुरवठा करणे | अ.शि.गंगावणे<br>प्र.सहायक संचालक<br>शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार, छत्रपती संभाजीनगर | शासनाने ठरवुन दिलेल्या विहित मुदतीत | रु.दि.मोरे<br>संचालक<br>शासन मुद्रण व लेखन सामग्री, मुंबई |
| २ | लोकसभा, विधानसभा, जिल्हापरिषद, पंचायत समित्या निवडणूकीसाठी आवश्यक लागणारी लेखन सामग्री व इतर साहित्य पुरवठा. | कित्ता | कित्ता | कित्ता |
| ३ | वरिल परिच्छेद १ मध्ये नमुद केलेल्या सर्व शासकीय कार्यालयातील टंकलेखन यंत्रे, प्रतिलिपी यंत्रे दुरुस्ती व संधारण करणे तसेच ग्रंथागार विभागामार्फत शासकीय प्रकाशनांची अल्प दरात विक्री केली जाते व सामान्य जनतेच्या नावात, धर्मात व जन्मतारखेत बदल करुन महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राव्दारे प्रसिध्दी करण्यांत येते. | कित्ता | कित्ता | कित्ता |

सहायक संचालक, (क.)
शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार,
छत्रपती संभाजीनगर.